# कार्यकर्ता पुरस्कार : प्रबोधन



मनोगत

## सुनीती सु. र.

स्वातंत्र्य चळवळीशी नाते असलेली कौटुंबिक पार्श्वभूमी, बाबा आमटेंच्या कार्यातून मिळालेली प्रेरणा आणि राष्ट्र सेवादलातून जडणघडण झालेल्या सुनीती सुलभा रघुनाथ या कार्यकर्त्रीने सुरुवातीच्या काळात 'समता आंदोलन' या संघटनेच्या माध्यमातून परित्यक्ता, गिरणी कामगार, सफाई कामगार आणि गरिबांच्या शिक्षणाचे प्रश्न यांसाठी काम केले. गेल्या दोन दशकांपासून, नर्मदा बचाओ आंदोलनात सक्रिय असलेली महाराष्ट्रातील एक प्रमुख कार्यकर्त्री. 'शांतता, न्याय व लोकशाही' हे ब्रीद असलेल्या व पर्यायी विकासनीतीची मांडणी करणाऱ्या जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (एन.ए.पी.एम.)ची महाराष्ट्र राज्य संयोजक. एन.ए.पी.एम.चे मुखपत्र असलेल्या 'आंदोलन : शाश्वत विकासासाठी' या मुखपत्राची कार्यकारी संपादक असलेल्या सुनीतीचा 'नर्मदा : गाथा संघर्ष नवनिर्माणाची' हा लेखसंग्रह प्रकाशित झाला आहे. अलीकडच्या काळात सुनीतीची ओळख अधिक ठळकपणे पुढे आली ती लवासाविरोधी आंदोलनातील तिच्या अभ्यासू व लढाऊ सहभागामुळे. पर्यावरण आणि पुनर्वसन या दोनही कारणांमुळे वादग्रस्त ठरलेल्या लवासा प्रकल्पाच्या विरोधात प्रसारमाध्यमांतून, न्यायालयाच्या माध्यमातून व सरकार दरबारी संघर्ष करून विकासाच्या प्रश्नावर तिने केलेली जनजागृती विशेष उल्लेखनीय आहे.

# शाश्वत विकासाची आस आणि ध्यास

**१९८८ मध्ये, मेधा पाटकर नावाचं वादळ माझ्या आयुष्यात आलं आणि ते माझं आयुष्यच बनून गेलं. नर्मदेची सगळी लढाई आतून बघताना, समजून घेताना, अनुभवताना त्यातील समग्रतेने, विनाशकारी प्रकल्पाविरोधी संघर्षासोबतच, शाश्वत विकासाची आस आणि ध्यास जाणवून झपाटून गेले. माझा स्वभाव आणि संस्कार या दोन्हीशी फार मेळ जमणारं हे आंदोलन होतं- आहे. विशेषत: सामूहिक निर्णयप्रक्रिया, लोकांशी नातं,आंदोलनाच्या पद्धती, मुद्दे आणि भूमिकेची बांधणी, 'मायक्रो ते मॅक्रो' अशी आंदोलनाचीही सैलसर बांधणी, मेधाची अत्यंत मानवीय नेतृत्वशैली, या सर्वांनी मी फार भारावून गेले. खेचलीच गेले.**

**मा**झे दोन्हीकडचे आजीआजोबा स्वातंत्र्याच्या चळवळीत होते. आजी तुरुंगात गेली, तेव्हा माझे वडील होते ११ वर्षांचे आणि आत्या ६ वर्षांची. आईचे आईवडील खादी कार्यकर्ते. महाराष्ट्र-आंध्र बॉर्डरवरच्या, तेव्हा (आणि नक्षलवाद्यांमुळे आजही) दुर्गम असलेल्या गावांमध्ये चरखा, खादी आणि त्याद्वारे रोजगार आणि स्वावलंबन नेण्याचा वसा घेतलेले. संघर्ष आणि रचना यांचा वारसा मला असा दोन्हीकडून मिळाला. पुढे वडीलही खादी-कार्यात पडले. तेव्हा खादी हे जन्मापासून अंगावर पडलेलं केवळ वस्त्र नव्हे, तर संस्कार बनला. आई अतिशय संवेदनशील, कलासक्त, कलावंतच; पण त्याहूनही अधिक सहृदय माणूस! रक्ताच्या नात्यापेक्षा घट्ट असं प्रेमाचं नातं विणायला आई-वडील आणि त्यांच्या भोवतालच्या मित्रपरिवारानेच शिकवलं.

वर्ध्याचा, महिलाश्रमातला हा परिवार म्हणजे छोटा भारतच होता. देशाच्या कानाकोपऱ्यांतून मुली तिथे शिक्षणशास्त्र शिकायला यायच्या. त्यामुळे अनेक भाषा, अनेक संस्कृती, परंपरांचा मिलाफ असलेला आणि या सर्वांच्या गाभ्यात त्या युवतींना आत्मसन्मानाचं आणि समतेचं लेणं देणारा असा महिलाश्रम. महिलाश्रमात वसंतोत्सवासारखे, जाती-धर्मापलीकडे निसर्गाशी जोडणारे उत्सव मोठ्या उत्साहात साजरे व्हायचे, तशीच शेतातली कामं. आम्ही मुलं सुटीत तुरीच्या आणि भुईमुगाच्या शेंगा काढण्याचं काम करत असू. गांधी स्मृतिदिनाच्या दिवशी २४ तासांची अखंड सूतकताई असे. त्यातलं ते मौन, गांभीर्य, कमिटमेंट,फार झपाटणारं होतं. महिलाश्रमात सामूहिक सफाई असे आणि त्यात अगदी संडास सफाईपर्यंतच्या (बादलीचे संडास होते) कामांचे संस्कार आम्हा मुलांवर सहज होत होते. या सर्वांनी माझ्यावर सहिष्णुतेचा, श्रमप्रतिष्ठेचा, समतेचा, सामूहिकतेचा खोल ठसा उमटवला. मला 'माणूस' बनवलं.

पुढे कॉलेजमध्ये असताना बाबा आमटे यांच्याकडे सोमनाथला एका युवा शिबिरासाठी गेले. ते फक्त तीन दिवस- पण विलक्षण चेतवणारे! बाबा नावाचा एक धबधबा नव्हे, प्रपातच! एकाच वेळी आवाहन करणारं आणि त्याचवेळी आव्हान देणारं त्यांचं बोलणं. सकाळी चार तास श्रमदान करून लालबुंद होऊन मोठ्या वीरश्रीने परत आलो आणि त्या गरम वांग्याच्या भाजी-भाकरीवर ताव मारायला लागलो की बाबा म्हणायचे, 'असं समजू नका की तुम्ही जे श्रम करताहात त्याच्या बदल्यात हे जेवण आहे. एवढ्या श्रमात या देशातल्या कष्टकऱ्याला एक वेळचं जेवणही

मिळत नाही. आज तुम्ही खात आहात ते इथल्या महारोग्यांच्या श्रमाने सिंचलेलं!'– खाडकन् थोबाडीत मारून डोळे उघडणारे बोल होते ते. वास्तवाचं भान देणारे आणि वास्तवाकडे उघड्या डोळ्यांनी बघायला लावणारे. त्या शिबिरातले कुरुंदकर, यदुनाथजी आणि बाबा! त्यांचं बोट धरूनच लोकशाही समाजवादाचा प्रवास सुरू केला; जीवननिष्ठाच बनली ती!

बाबांकडेच विनय भेटला; पण तो पुढे. मधल्या काळात आणीबाणी आली. आम्ही सेवादल– समाजवादी पक्षाच्या माध्यमातून काहीबाही धडपड करत होतो. रक्त सळसळत होतं. सोबती मिळत होते. कात टाकल्यासारखा नवा जन्मही होत होता. भाषा बदलत होती, अभिव्यक्ती बदलत होती, स्वभावात नसलेली आक्रमकता व्यक्तिमत्त्वात येत होती. या साऱ्यांचा संस्कार कुटुंबातून झालेला नव्हताच. कुटुंबातून मिळाला होता तो निखळ समतेचा संस्कार. पण बाहेर विषमतेचं वास्तव किती दाहक आहे हे दिसायला लागलं, अनुभवाला यायला लागलं. विविध स्तरांतले, अनुभवविश्वातले मित्र मिळत गेले, तसतशी करुणा आणि समत्वाची जागा विषमतेची चीड आणि वंचितांच्या हक्कांच्या आग्रहाने घेतली. तरीही तसं अमूर्तच होतं सगळं. वास्तवाला भिडायचं, त्याच्याशी दोन हात करायचे, स्वत: 'डी–डी'– व्हायचं म्हणजे काय करायचं, ते कळत नव्हतं. एक अस्वस्थता, एक घुसमट– त्या काळात वाचलेली पुस्तकं– 'फिडेल'चे आणि 'क्रांती' किंवा 'थँक यू मिस्टर ग्लाड' झपाटून टाकायची.

**आम्ही सेवादल– समाजवादी पक्षाच्या माध्यमातून काहीबाही धडपड करत होतो. रक्त सळसळत होतं. सोबती मिळत होते. कात टाकल्यासारखा नवा जन्मही होत होता. भाषा बदलत होती, अभिव्यक्ती बदलत होती, स्वभावात नसलेली आक्रमकता व्यक्तिमत्त्वात येत होती. या साऱ्यांचा संस्कार कुटुंबातून झालेला नव्हताच. कुटुंबातून मिळाला होता तो निखळ समतेचा संस्कार. पण बाहेर विषमतेचं वास्तव किती दाहक आहे हे दिसायला लागलं, अनुभवाला यायला लागलं. विविध स्तरांतले, अनुभवविश्वातले मित्र मिळत गेले, तसतशी करुणा आणि समत्वाची जागा विषमतेची चीड आणि वंचितांच्या हक्कांच्या आग्रहाने घेतली.**

आणीबाणी आणि त्यानंतर– एक मोठ्ठी लाट आली आणि गेली. त्यात काही बुडाले, काही तगले; काही किनाऱ्याला लागले. काही एनजीओ नावाच्या नव्या ऐटदार जहाजाचे कप्तान होऊन पुन्हा नव्या लाटेवर स्वार होत जगाच्या सफरीवर निघाले, इत्यादी. मी काय केलं? फ्रस्ट्रेशनमधून वगैरे नाही, पण इतर मित्र जे काही करत होते त्यात (तरी) आशादायक काही न दिसल्याने, आणि स्वत: काही उभं करण्याची धडाडी किंवा आत्मविश्वासही कदाचित नसल्याने, मी सरळसोट मध्यमवर्गीय आयुष्य स्वीकारलं. म्हणजे बँकेतली नोकरी, विनयसारखा अत्यंत जबाबदार, समजूतदार, सहिष्णू नवरा, घर– दोन मुली... असं सारं काही.

अर्थात नोकरी–कुटुंब एवढंच करणं हा माझा स्वभाव नव्हता. ती पत्करलेली जीवनशैली आणि त्याला आवश्यक ती तरतूद होती एवढंच. व्यक्तिमत्त्वात भिनलेलं कार्यकर्तेपण सतत उसळी मारून वर यायचं. काय करतोय हे आपण?... याचा सतत त्रास व्हायचा. या सर्वांत विनयची सर्वार्थाने समजूतदार साथ असायची. म्हणूनच, फारशी गॅप न पडता, मी– खरं तर आम्ही– पुन्हा कामात ओढले गेलो.

समता आंदोलनात आम्ही दोघंही सक्रिय झालो. पुन्हा एकदा कुटुंब विस्तारलं. सर्व संध्याकाळी–आणि शनिवार– 'बुक' झाले. मुलींना काखोटीला मारून आम्ही शिबिरं, पाहण्या, पथनाट्यं, वस्तीतली कामं करायचो. पुण्यात तरुणांचा चांगला ग्रुप जमला. पोरीही रमायच्या या सर्वांत.

'समता आंदोलना'चं मुंबईत गिरणी कामगार, ठाण्यात सफाई कामगार, नाशिकमध्ये गरिबांच्या शिक्षणाच्या प्रश्नावर, अहमदनगर जिल्ह्यात परित्यक्तांच्या प्रश्नावर जोरकस काम सुरू होतं. पुण्यातही आमचं काम लोहियानगर, वडारवाडी अशा गरीब वस्त्यांमध्ये मूळ धरू लागलं. 'आंदोलन' मासिकाची जबाबदारीही तेव्हापासूनच माझ्याकडे आली. विशेष म्हणजे, 'समता आंदोलना'त आमच्यापैकी कुणीही पूर्णवेळ कार्यकर्ता नव्हतं. सगळेच

नोकरीधंदा सांभाळून हे काम करणारे. पण जोष मस्त होता. दलित-तरुण मुलंमुली जोडली गेली होती. आम्ही एक 'संसदबाह्य राजकीय संघटन' होतो, आणि त्यामुळे प्रत्येक मुद्यावर आमची मतं, भूमिका, प्रतिक्रियाही होतीच. आमच्या त्या कामाचं कधीतरी स्वतंत्रपणे मूल्यमापन करायला पाहिजे; पण समाजवादी चळवळीच्या त्या पडझडीच्या काळात आम्ही एका मर्यादित क्षेत्रात का असेना, 'लोकशाही समाजवाद' जिवंत आणि जागता ठेवला होता, एवढं मी निश्चित म्हणेन.

याच दरम्यान १९८८ मध्ये, मेधा पाटकर नावाचं वादळ माझ्या आयुष्यात आलं आणि ते माझं आयुष्यच बनून गेलं. नर्मदेची सगळी लढाई आतून बघताना, समजून घेताना, अनुभवताना त्यातील समग्रतेने, विनाशकारी प्रकल्पाविरोधी संघर्षासोबतच, शाश्वत विकासाची आस आणि ध्यास जाणवून झपाटून गेले. माझा स्वभाव आणि संस्कार या दोन्हीशी फार मेळ जमणारं हे आंदोलन होतं- आहे. विशेषत: सामूहिक निर्णयप्रक्रिया,लोकांशी नातं,आंदोलनाच्या पद्धती, मुद्दे आणि भूमिकेची बांधणी, 'मायक्रो ते मॅक्रो' अशी आंदोलनाचीही सैलसर बांधणी, मेधाची अत्यंत मानवीय नेतृत्वशैली, या सर्वांनी मी फार भारावून गेले. खेचलीच गेले.

त्यानंतर जागतिकीकरणाचा दौर; दुसरीकडे बाबरी मस्जिद पाडून हिंदू अतिरेक्यांनी भारतीय सेक्युलॅरिझमलाच दिलेलं आव्हान; या सर्व पार्श्वभूमीवर, विनाशकारी विकास, विस्थापन आणि विषमतेच्या विरोधात झगडणाऱ्या देशभरातील जनआंदोलनांचा मंच उभा राहिला 'जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय!' एन्रॉन, डंकेल ड्राफ्ट, प्लाचिमाडाची कोकाकोला विरोधातली लढाई, देश बचाओ-बनाओ ते अगदी आज नंदीग्राम, सिंगूर, पॉस्को, काकीनाडा, कुडन्कुलम्, घर बचाओ घर बनाओ, लवासापर्यंत अनेकानेक आंदोलनं आणि त्यांतून देशाच्या प्रस्थापित विकासनीतीला धक्के देत, शाश्वत विकासनीतीचा पर्याय उभा करण्याचा आग्रह. या साऱ्यांबरोबर मी घडत गेले. नोकरीत 'करियर' करायची नाही हे नोकरीच्या पहिल्याच दिवशी ठरवलं होतं. गरज संपताच ती सोडायची, हे देखील. त्याप्रमाणे २००१ साली कुटुंबाच्या पूर्ण सहकार्याने नोकरी सोडायचा निर्णय सहज घेता आणि पार पाडता आला.

सुमारे २० वर्षांच्या 'समर्थक' या भूमिकेमधून 'कार्यकर्ता' या भूमिकेमध्ये शिरताना उत्साह खूप होता, पण विशी-पंचविशीतली ऊर्मी आणि धडक देण्याची धमक आता चाळिशीनंतर असेल की नाही, ही शंकाही होती. इतका काळ सतत दुसऱ्या फळीत काम केल्याने आता कार्यकर्त्यांच्या पहिल्या फळीत काम करणं जमेल की नाही; तो आपला पिंड तरी असेल की नाही, ही भीतीही होतीच मनात. मात्र 'एनएपीएम' मधलं सामूहिक नेतृत्व, सामूहिक निर्णयप्रक्रिया आणि सामूहिक जबाबदारी हे सारंच अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. ती सारी प्रक्रियाच मला फार सुंदर आणि सहज वाटते. त्यामुळे माझ्या बाबतीतही हे स्थित्यंतर अतिशय सहज घडलं.

स्वावलंबनावर आधारित समाजरचनेकडे शांतिपूर्ण मार्गांनी संघर्ष व निर्माणाद्वारे वाटचाल करणं हे 'एनएपीएम'चं उद्दिष्ट आहे. जनआंदोलनांच्या समन्वयातून एक राष्ट्रीय जनआंदोलन उभारण्याचं स्वप्नही आहे. माझ्यापुरतं मी एवढंच म्हणेन, की शाश्वत विकास, समता ही एक चिरंतन आणि निरंतर प्रक्रिया आहे. त्या दिशेने आपल्याला जितकी पावलं टाकता येतील, तितकी निर्धाराने, आनंदाने, सर्वांसह टाकावीत. तेच मी करते आहे.

या साऱ्या काळातल्या, माझ्या जिवाभावाच्या अशा संघर्षांमध्ये जे साथी मिळाले, त्यांनी देखील मला खूप समृद्ध केलं. आपल्या जगण्याची लढाई अथकपणे लढता लढताच पर्यायी विकासनीतीची आस बाळगणारे चिवट लोक आणि तोच ध्यास घेणाऱ्यांच्या सोबत आपलं तारुण्यही झोकून देणारे कार्यकर्ते. . . हे सारे माझे गुरू आहेत. माझं आत्ताचं जगणं हा यांना खरा सलाम आहे.

मला स्वत: आयुष्यात कुठलाच संघर्ष करावा लागला नाही. कुटुंबाची साथ मिळाली, तशीच मित्रांची. दोन्ही मुलींना आज आमच्याच जीवननिष्ठांनी वाटचाल करताना पाहते तेव्हाही सार्थकच वाटतं. सर्वांकडूनच मला भरभरून मिळालं. जितकं मिळतं त्याहून अधिक परत केलं पाहिजे म्हणतात. ते मी करू शकते का, पाहिलं पाहिजे!

**सुनीती सुलभा रघुनाथ**
६, राघव, श्रीरघुराज सहनिवास,
सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०
Mob. : 9423571784
sunitisr@gmail. com

ओळख
**मेधा पाटकर**

# विचार व कृती यांची प्रगल्भता व सखोलता

सुनीतीताईंविषयी लिहिणे म्हणजे वैविध्य आणि व्याप्ती हे दोन्ही गुणधर्म असलेल्या त्यांच्या सामाजिक कार्याविषयी, तितकेच त्यांच्या संतुलित, सकारात्मक व्यक्तित्वाविषयीही लिहिणे. सर्वोदयी विचारांच्या कुटुंबात जन्म झाल्यामुळेच नव्हे तर बालपण व तारुण्यातील प्रबोधन आणि प्रत्यक्ष कार्यातील अनुभवामुळे आज त्यांची गणना प्रबुद्ध सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये होत आहे व संघर्ष व निर्माण या दोन्ही मार्गांनी पुढे गेलेल्या त्यांच्या कार्याचे मोल किती आहे, हे महाराष्ट्राला माहीत झाले आहे.

स्वातंत्र्य चळवळीशी नाते असलेले वडीलधारे, राष्ट्र सेवादलातून मिळालेली वैचारिक पुंजी आणि नंतर समाजवादी–गांधीवादी चळवळीचा भाग बनून प्राप्त करून घेतलेली अनुभवाची शिदोरी अशा तीन स्तंभांवर ज्यांचे कार्य उभे राहिले असे अनेक सामाजिक कार्यकर्ते महाराष्ट्रात ठिकठिकाणी आढळतात. सुनीतीताई या त्यांतल्याच एक. त्यातही, जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील, युवाशक्तीला वाव व बळ देणारी, संपूर्ण क्रांतीचा नजरिया पुढे मांडणारी अशी चळवळही अनेक कार्यकर्त्यांप्रमाणे सुनीतीताईंना मार्गदर्शक ठरली. 'सुनीती सुलभा–रघुनाथ' असे, आईचे व वडिलांचे नाव लावणे त्यांनी स्वीकारले ते त्यातूनच.

तरुण वयात, भारावलेल्या काळातही, सखोल चिंतन व प्रभावी कार्यक्रम यांसह 'समता आंदोलन' या युवक–युवतींच्या संघटनेद्वारे सुनीतीताईंनी अनेक वर्षे आपले योगदान दिले. तरुणांचा हा समूह शिक्षण, नोकरी इ. सांभाळून परित्यक्तांच्या प्रश्नांवर, गिरणी कामगारांच्या प्रश्नांवर, गरिबांच्या शिक्षणाच्या प्रश्नावर, स्वदेशी चळवळीचा हिस्सा बनून, अशा विविधांगी कार्यातून नावाजला गेला. त्यात त्या सतत पहिल्या फळीच्या कार्यकर्त्यांत राहिल्या. मधल्या काळात विवाह व कुटुंबाची जबाबदारी पार पाडत असतानाच आपली बँकेतील नोकरी सांभाळूनही त्यांनी सामाजिक कार्यातील सशक्त सहभाग हा चालूच ठेवला व संपूर्ण कुटुंब, पती प्रा.विनय र.र. हे विज्ञानकार्यातील सृजनशील प्रबोधनकर्ते, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सहभागी दोन्ही मुली अर्चिस व ओजस (आता शर्मिला इरोम या, हिंसेविरोधात ११ वर्षांपासून अन्नत्याग केलेल्या कार्यकर्तीच्या संघर्षावरील प्रभावी नाट्य साकारणारी म्हणून प्रसिद्ध) यांच्यासह ते पुढेही नेले. त्या काळातही सुनीतीताईंचा पुणे व महाराष्ट्राच्या अन्य भागातील ग्रामीण चळवळींशी संपर्क राहिला. 'आंदोलन' या मासिकाचे संपादकत्व पार पाडत एक भरीव, पर्यायी माध्यम उभारण्याचे कार्यही त्यांच्या हातून घडले.

नर्मदा बचाओ आंदोलनाच्या प्रत्येकच टप्प्यावर, प्रत्येक संघर्षात व नवनिर्माण अभियानातील, जीवनशाळा व अन्य

कार्यांतील सुनीतीताईंचा सहयोग व सहभाग हा अनेकांना जोडत, आंदोलनाला बळ देत गेला. पुण्यातील नर्मदा बचाओ आंदोलन समर्थन गटाचा त्या नेहमीच एक महत्वाचा दुवा राहिल्या.

आपल्या व्यापक विचारसरणीला अनुसरूनच सुनीतीताईंनी जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयात अगदी स्थापनेपासून पुढाकार घेतला व गेल्या सुमारे १५ वर्षांत या राष्ट्रीय संघटनेमार्फत आपले कार्य व संघटनेचा परिवर्तनाच्या दिशेने हस्तक्षेप, प्रभाव-दबावही वाढवला. महाराष्ट्रातील, १०० वर्षांपूर्वी विस्थापित झालेल्या टाटा धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या मागणीपासून तर धरण पुरे होत आले तरी पुनर्वसन मागेच असल्यामुळे आपल्या गावांमध्ये ठामपणे उभे असलेल्या वांग-मराठवाडी धरणग्रस्तांना सुनीतीताईंचे सहकार्य नियमित मिळते आहे. न्याय्य व कायदेशीर भूमिकेचा आग्रह धरत हे कार्य नेटाने, पुनर्वसनाच्या दिशेने शासनाशी संवाद व संघर्षातून पुढे नेत असतानाच प्रकल्पग्रस्तांशीही सतत संवाद, त्यांना आपल्या प्रश्नांपलीकडे व्यापक समाजपरिवर्तनाच्या भूमिकेशी जोडून घेणे, शांतिपूर्ण मार्गांचा आग्रह व त्यांचा विवेकी वापर यांसाठी लोकांना तयार करणे, हे चालू आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनच नव्हे तर विस्थापन व त्याचे मूळ ज्या विकासाविषयीच्या ध्येय-धोरणांमध्ये आहे, त्याची परखड मीमांसा व त्याविषयीचे समाजाचे मतनिर्माण आणि शासनाला आव्हान उभे करण्यासाठी विचार व कृती यांची प्रगल्भता व सखोलता, राजकीय दृष्टी व सामाजिक कार्यातील कठोर परीक्षा देण्यासाठी लागणारी चिकाटी व जिद्द हा सारा सुनीतीताईंचा ठेवा आहे. लवासा प्रश्न जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाने हाती घ्यायचे ठरवल्यापासून, हिंमतीने लढणाऱ्या कातकरी-शेतकऱ्यांना केंद्रभागी ठेवत, अनेकांना जोडत, हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेण्यात सुनीतीताईंचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. विशेषत: लवासा कंपनीविरुद्धच्या लढ्यातील जमिनीचे प्रश्न असोत, अथवा विकास नियोजनातील भ्रष्टाचाराचा, बेकायदेशीरपणाचा तपशील असो; सर्वांचा अभ्यास, त्यावर लेखन तसाच जमिनी संघर्ष उभारण्याची कुशलता त्यांच्याकडे आहे. आज, लवासाकडे बेकायदेशीररीत्या वळवल्या गेलेल्या आदिवासींच्या जमिनी त्यांना परत करण्याची प्रक्रिया सुरू होणे, लवासाच्या बांधकामातील बेकायदेशीर बाबी बाहेर आल्यामुळे त्यांची स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी रद्द करण्याचे संकेत मुख्यमंत्र्यांनी देणे तसेच जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे केलेल्या तक्रारीची व समन्वयासह अन्य परिवर्तनवादी-पर्यावरणवादी संघटनां-संस्थांच्या वतीने सुनीतीताई व अन्य कार्यकर्त्यांनी दाखल केलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिकेची दखल घेत, पर्यावरणीय कायद्यांच्या उल्लंघनासंदर्भात मागील वर्षभर लवासाचे काम बंद राहणे, हे सर्व घडले आहे. ज्यांच्या 'साम्राज्या'ला धक्का लावणे अशक्य वाटावे असे राजकारणी लवासाच्या पाठीशी असतानाही हे घडले, घडते आहे, हे विशेष. सामाजिक चळवळींतील कार्यकर्त्यांसाठी आवश्यक असलेल्या गुणांचे संमिश्रण सुनीतीताईंकडे आहे, त्यामुळेच विविध माध्यमांतून हे कार्य त्यांनी पुढे नेले. आजही लवासामध्ये मैदानी व माध्यमी तसेच कानूनी संघर्ष सुरूच आहे आणि तो स्थानिक शेतकऱ्यांसह, कार्यकर्त्यांसह, माहिती अधिकार, पर्यावरण, नगरनियोजन, कायदे क्षेत्रांतील तज्ज्ञांची तसेच

**प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनच नव्हे तर विस्थापन व त्याचे मूळ ज्या विकासाविषयीच्या ध्येय-धोरणांमध्ये आहे, त्याची परखड मीमांसा व त्याविषयीचे समाजाचे मतनिर्माण आणि शासनाला आव्हान उभे करण्यासाठी विचार व कृती यांची प्रगल्भता व सखोलता, राजकीय दृष्टी व सामाजिक कार्यातील कठोर परीक्षा देण्यासाठी लागणारी चिकाटी व जिद्द हा सारा सुनीतीताईंचा ठेवा आहे. लवासा प्रश्न जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाने हाती घ्यायचे ठरवल्यापासून, हिंमतीने लढणाऱ्या कातकरी-शेतकऱ्यांना केंद्रभागी ठेवत, अनेकांना जोडत, हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेण्यात सुनीतीताईंचा महत्वाचा वाटा राहिला आहे.**

माध्यमकर्त्यांचीही साथ-सहयोग मिळवत सुनीतीताई कुशलतेने पुढे नेत आहेत.

संपूर्ण परिवर्तनाची आस व दृष्टिकोन असला तर कुठल्याही क्षेत्रात अन्याय, लूट, शोषण, अत्याचार दिसला तर, आपल्या हातातील तुटपुंज्या साधनांमुळे वा क्वचितप्रसंगी साधनांच्या पूर्ण अभावामुळेही गांगरून न जाता त्या प्रश्नाला भिडण्याची कार्यकर्त्याची वृत्ती सुनीतीताईंमध्येही आहे. त्यामुळेच, जागतिकीकरण-कंपनीकरणाच्या भयावह हल्ल्याच्या पार्श्वभूमीवरही, खादी-ग्रामोद्योगाच्या प्रचारप्रसारातून, भरघोस विक्रीतून, व हे

**'आंदोलन – शाश्वत विकासासाठी' या, परिवर्तनकारी चळवळींचा, पर्यायी शाश्वत विकासाच्या विस्तृत संकल्पनेचा व विकेंद्रित कार्याचा वेध घेणाऱ्या व प्रत्येक स्थानिक ते राष्ट्रीय प्रश्नावर जनआंदोलनांची राजकीय-आर्थिक भूमिका प्रखरपणे मांडणाऱ्या मासिकाचा मोठा व्याप, सहकाऱ्यांच्या मदतीने पण सुनीतीताईंच्याच नेतृत्वाने आजवर सांभाळला गेला आहे. या निमित्ताने गांधी, फुले, आंबेडकर, मार्क्स, लोहिया, जयप्रकाशांच्या विचारधारेचे संमिश्र प्रतिबिंब असलेले सकस लेखन अनेकानेक राज्य व राष्ट्रीय स्तरावरील लेखकांकडून, विचारवंतांकडून, कार्यकर्त्यांकडून त्यांनी परिश्रमपूर्वक मिळवले आहे आणि मराठी जगतातील समानशील, संवेदनशील अशा हजारो व्यक्ती व शेकडो संघटनांना त्यातून वैचारिक ठेवा मिळत आहे.**

केवळ विक्रीपुरतेच मर्यादित न ठेवता साधगीयुक्त, रोजगाराभिमुख, निसर्गसंवादी जीवनशैलीच्या मांडणीतून व त्यांचा आग्रह धरत पर्याय पुढे ठेवण्याची त्यांची सतत धडपड असते. साहित्य, कला, समतावादी संस्कृती, पर्यायी-शाश्वत विकासाच्या संकल्पना, तंत्रज्ञानाची निवड या सर्वांसाठी, वेळ अपुरा असतानाही पुरेसा वेळ देत, स्वत:चे व्यक्तित्व अशा निर्माणकार्यातून त्या समृद्धही करत राहतात. त्यांचा जीवनक्रम, जीवनप्रणाली, कुटुंबातील नातीगोती तसेच विविध क्षेत्रांतील कार्यकर्ते आणि बुद्धिजीवी, राजकीय-सामाजिक क्षेत्रांतील पाठीराखेही जोडून घेण्याची, जोडून ठेवण्याची कुशलता यांतून हे दिसून येते.

शिक्षणासारख्या क्षेत्रातही, मराठी शाळा टिकू द्या...चा आक्रोश उठला, तेव्हा समन्वय व संघटनबांधणीचे सुनीतीताईंचे कौशल्य व अनुभव त्यात उतरला, हे अलीकडच्या काळात अनेकांना जाणवले. बालकाच्या विकासासाठी मातृभाषेतून-परिसरभाषेतून शिक्षणाचा आग्रह धरण्याबरोबरच, गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे असावे, त्याचे सार्वत्रिकीकरण कसे होईल व 'समान शिक्षण' ही संकल्पना गुणवत्तापूर्ण व स्वायत्त शिक्षणासोबतच प्रत्यक्षात कशी येईल याचा ध्यास घेत त्या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना यथाशक्ती सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी घेतली.

'आंदोलन-शाश्वत विकासासाठी' या, परिवर्तनकारी चळवळींचा, पर्यायी शाश्वत विकासाच्या विस्तृत संकल्पनेचा व विकेंद्रित कार्याचा वेध घेणाऱ्या व प्रत्येक स्थानिक ते राष्ट्रीय प्रश्नावर जनआंदोलनांची राजकीय-आर्थिक भूमिका प्रखरपणे मांडणाऱ्या मासिकाचा मोठा व्याप, सहकाऱ्यांच्या मदतीने पण सुनीतीताईंच्याच नेतृत्वाने आजवर सांभाळला गेला आहे. या निमित्ताने गांधी, फुले, आंबेडकर, मार्क्स, लोहिया, जयप्रकाशांच्या विचारधारेचे संमिश्र प्रतिबिंब असलेले सकस लेखन अनेकानेक राज्य व राष्ट्रीय स्तरावरील लेखकांकडून, विचारवंतांकडून, कार्यकर्त्यांकडून त्यांनी परिश्रमपूर्वक मिळवले आहे आणि मराठी जगतातील समानशील, संवेदनशील अशा हजारो व्यक्ती व शेकडो संघटनांना त्यातून वैचारिक ठेवा मिळत आहे. व्यापारी वृत्ती टाळून, समविचारी संस्था-व्यक्तींच्या पाठिंब्याने, अनेक स्वयंसेवकांच्या मदतीने पर्यायी माध्यमातूनही आवश्यक तितकी मुख्य धारेत हस्तक्षेपाची क्षमता निर्माण करण्याचे कार्य एक मासिक स्वावलंबी पद्धतीने करू शकते, हेच या निमित्ताने त्यांनी दाखवून दिले आहे. यासह, 'विकासाच्या नव्या वाटा' (आंदोलन'मधील

लेखांचे संकलन), 'समृद्धीची लूट' (लेखक- वंदना शिवा), 'उद्गार' व 'दर्शन' (लेखक- संजय संगवई), 'सेझ : अराजकाची नांदी' (लेखक- उल्का महाजन) अशा अनेक पुस्तकांची निर्मिती व 'नर्मदा गाथा संघर्ष-नवनिर्माणाची'सारख्या पुस्तकातून त्यांचे स्वत:चेही महत्त्वपूर्ण लेखन घडले आहे. सुंदर, सहज तरीही स्पष्ट व सखोल लेखन हे सुनीतीताईंचे वैशिष्ट्य.

जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाच्या राष्ट्रीय समन्वयक या नात्याने जनआंदोलनांची सेझसारख्या कार्पोरेटी धोरणासह अनेक मुद्यांवर भूमिका व रणनीती ठरवण्यात सुनीतीताई सक्रिय आहेत. प्रस्तावित भूसंपादन कायद्याऐवजी, ज्यात विस्थापन म्हणजेच पर्यायाने भूसंपादनही कमीतकमी करावे लागेल अशा विकास नियोजनाचा कायदा करा ही मागणी दीर्घकाळ लावून धरण्याच्या जनआंदोलनांच्या आग्रहात त्यांचाही वाटा आहे. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातही त्यांनी आपली भूमिका बजावली व त्याचे सुंदर विश्लेषण करणारे लेखनही केले. संघर्षाबरोबरच निर्माण क्षेत्राविषयीची त्यांची ओढ, सुस्पष्ट विचार, मूल्यांची जाण व आग्रह, ध्येयाकडे नेणाऱ्या मार्गावर अथक कार्य, परिश्रम करत पुढे जातच राहण्याइतकी स्थिर मनोवृत्ती व चिकाटी हे त्यांचे गुणविशेष वेळोवेळी प्रगट झाले आहेत. भ्रष्टाचार, अत्याचार, लूट, शोषण, हिंसा व अन्याय तसेच विस्थापन, विनाश विषमता बोकाळलेल्या परिस्थितीतही सुनीतीताईंच्या सुरेल गळ्यातून निघणाऱ्या

*साधना का पथ कठिन है।*
*शपथ लेना तो सरल है, पर निभाना ही कठिन है।।*
*... सरल है आँसू बहाना, मुस्कुराना ही कठिन है।।*

या प्रेरणादायी गीताप्रमाणेच त्यांचे कार्य मनस्वी व मानवीय वृत्तीच्या बळावर, सामाजिक बांधिलकीसह चालूच आहे व राहणार. अनेक आव्हाने स्वीकारणार व आजवर झाले त्याहीपलीकडे कुठेतरी, केव्हातरी राष्ट्रीय पातळीवरही धडकण्यासाठी जनआंदोलन अधिक बळकट करणार हे निश्चित.

महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे त्यांना मिळणारा पुरस्कार हा त्यांना मिळालेल्या आजवरच्या अनेक पुरस्कारांपलीकडे, आजच्या ताज्या संदर्भात व सुनीतीताईंच्या अनेक नव्या कार्यकलापांमुळे, महत्त्वपूर्ण व त्यांच्या कार्याला पाठबळ देणारा ठरणार आहे.

**मेधा पाटकर**
म. गांधी मार्ग, बडवानी, मध्यप्रदेश
medha.narmada@gmail. com